# आरे मेट्रो कारशेड उभारण्यास सर्वोच्च न्यायालयाने दिली मंजुरी

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने मुंबईच्या आरे येथील मेट्रो कारशेडला हिरवा कंदील दाखविला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, प्रचंड लोकसंख्येच्या मुंबईमध्ये मेट्रो रेल्वे ही अत्यंत महत्त्वाची आहे. आरे मेट्रो कारशेडसाठी संजय गांधी उद्यानातील राष्ट्रीय उद्यानातील ४०७ एकर जमीन उद्यानाच्या जंगलातून वगळण्याचा निर्णय राष्ट्रीय हरित लवादाने घेतला होता. त्या निर्णयाला 'वनशक्ती संघटने'ने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. ही आव्हान याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे.

## गर्दीच्या मुंबईत मेट्रो रेल्वे महत्त्वाची



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरुण मिश्रा आणि अब्दुल एस नजीर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने वनशक्ती संघटनेच्या स्टालिन दयानंद यांनी दाखल केलेली राष्ट्रीय हरित लवादाच्या विरोधातील आव्हान याचिका फेटाळून लावली आहे. संजय गांधी उद्यानातील आरेचे जंगल हे पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील झोन आहे, असे वनशक्ती संघटनेचे म्हणणे आहे. मात्र यापूर्वी हरित राष्ट्रीय हरित लवादाचे अध्यक्ष न्यायमूर्ती ए.के गोयल, न्यायमूर्ती एस. पी. वांगडी तज्ञ नगिन नंदा, सिद्धांत दास आदींनी वनशक्ती संघटनेची याचिका फेटाळून लावली होती. संजय गांधी » पान ५ वर